# बाबासाहेब आणि ग्रंथपाल

डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या आयुष्यात खूप त्रास सहन केले पण त्याचा परिणाम त्यांनी कधीही आपल्या शिक्षणावर होऊ दिला नाही. ते दररोज १४ ते १८ तास अभ्यास सहजच करत असे.

बाबासाहेबांना पुस्तके वाचण्याची फार आवड होती. असे म्हणतात की त्यांची वैयक्तिक लायब्ररी जगातील सर्वात मोठी लायब्ररी होती आणि त्यात पुस्तकांची संख्या ५० हजारांपेक्षा जास्त होती.

शाहू महाराजांनी त्यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले.

लंडन येथे राहत असताना ते एका लायब्ररीत दररोज जात होते. लायब्ररी उघडण्यापूर्वी ते हजर असत आणि लायब्ररी बंद होतानाचे शेवटचे विद्यार्थी बाबासाहेब होते. ते तासनतास अभ्यास करत असत. **त्यांच्याजवळ पुस्तके घेण्यासाठीच काय तर जेवणासाठी व राहण्यासाठी पण पैसे नसत. पुस्तके विकत घेता येत नाहीत म्हणून ते दिवस-रात्र लायब्ररीमध्ये असत. भूक लागली तर वेळ वाया जाऊ नये म्हणून मध्येच खिशातून पाव काढून गुपचूप खात असत.**

एकदा ते दुपारच्या जेवणाच्या वेळी लायब्ररीत बसून पावाचा तुकडा खात होते तेव्हा ग्रंथपालाने त्यांना बघितले आणि रागाने बोलले, " **मिस्टर, हे ग्रंथालय आहे. तुला माहीत आहे ना येथे तुम्हाला खाता येत नाही.** कॅफेटेरियात जाण्याऐवजी तू येथे लपून- छपून खात आहेस. **तू नियम मोडला आहेस, तेव्हा आता तुम्हाला शिक्षा करावी लागेल."**

त्यावर बाबासाहेब उत्तरले**, "मला क्षमा करा. यापुढे मी नियम पाळील. उपाशीच वाचत बसेन. मग तर झालं?"**

ग्रंथपाल म्हणाला, **"अपराध करणाऱ्याला क्षमा नाही."**

बाबासाहेब म्हणाले, **"शिक्षा करा पण एक विनंती आहे."**

ग्रंथापालाने विचारले, **"कोणती?"**

बाबासाहेब म्हणाले, **"माझ्यासाठी हे ग्रंथालय बंद करू नका. ग्रंथांशिवाय मी जगू शकत नाही. याव्यतिरिक्त कोणतीही शिक्षा भोगायला मी तयार आहे."**

स्वतःच्या आणि आपल्या समाजाचा संघर्ष आणि इंग्लंडमध्ये येण्याचे कारण सांगितले. तसेच दुपारच्या जेवणासाठी कॅफेटेरियात जाण्यासाठी आपल्याकडे पुरेसे पैसे नसल्याची प्रामाणिक कबुलीही त्यांनी दिली.

हे ऐकून ग्रंथपाल म्हणाला, **"तुम्हांला शिक्षा तर मिळणारच. तुमची शिक्षा म्हणजे उद्यापासून तुम्ही माझ्यासोबत जेवायचे. तुमचं दबा मी आणत जाईल. दुपारच्या जेवण्याच्या वेळी माझ्यासोबत कॅफेटेरियात येणार."**

ऐकून बाबासाहेबांचे डोळे पाणावले व त्यांनी त्या ज्यू (यहुदी) ग्रंथापालाचे हात हातात घेऊन कृतज्ञता मानली.

# गोरेगावचा प्रवास

नमस्ते मुलांनो,

मी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर बोलतोय. आज माझ्या आयुष्यातील एक प्रसंग मी तुम्हाला सांगणार आहे.

पहिला प्रसंग जो मला आठवतो तो आम्ही सातारा मुक्कामी असतानाचाच आहे. माझी आई तोपर्यंत मरण पावली होती. माझे वडील सातारा जिल्ह्याच्या गोरेगाव या दूरच्या गावी कोशपाल म्हणून नोकरी करत होते. दुष्काळामध्ये हजारोंच्या संख्येने मृत्युमुखी पडत असलेल्या दुष्काळग्रस्त लोकांना रोजगार पुरविण्याच्या हेतूने त्या ठिकाणी मुंबई सरकारने तलाव खोदण्याचे काम सुरू केले होते.

गोरेगावला जाताना मी, माझ्यापेक्षा मोठा असलेला माझा भाऊ आणि माझ्या थोरल्या मृत (मेलेल्या) बहिणीची दोन मुले आम्हा सर्वांना वडिलांनी माझ्या आत्याच्या आणि काही दयाळू शेजाऱ्यांच्या हवाली केले होते.

खजिनदार असल्यामुळे बाबा काही गाव सोडून साताऱ्याला आम्हाला भेटायला येऊ शकत नव्हते, म्हणून मग त्यांनी आम्हालाच पत्र लिहून गोरेगावला उन्हाळ्याच्या सुट्यांत त्यांच्यासोबत राहायला बोलावले होते. आम्ही सर्व मुले जायला मिळणार म्हणून आतून-बाहेरून उतावीळ झालो होतो, कारण तोपर्यंत आम्ही कोणीही रेलगाडीच पाहिलेली नव्हती.

आम्ही खूप तयारी केली. प्रवासासाठी इंग्रज पद्धतीचे नवे सदरे, चमकत्या जरीच्या टोप्या, नवे बूट, नवी रेशमी किनारीची धोतरे यांच्या ऑर्डरी दिल्या गेल्या.

बाबांनी मला प्रवासाच्या सर्व सूचना देऊन ठेवल्या होत्या. आम्ही कोणत्या दिवशी निघणार असल्याचे त्यांना कळवायला सांगितले होते. म्हणजे मग ते त्यांच्या शिपायाला रेल्वेस्थानकावर पाठवून आम्हाला उतरून घ्यायला व गोरेगावास आणायला सांगणार होते. या योजनेनुसार मी, माझा भाऊ आणि माझ्या बहिणीचा एक मुलगा सातारा सोडून निघालो. आत्याला आम्ही शेजाऱ्यांवर सोपवले. तिची नीट काळजी घेऊ अशी हमी त्यांनी घेतली. आम्ही राहात होतो तेथून रेल्वेस्थानकापर्यंत न्यायला आम्ही टांगा केला होता. खास त्या प्रसंगासाठी शिवलेले नवे कपडे आम्ही घातले होते. आम्ही आनंदात घर सोडले, पण माझी आत्या मात्र आकांत करत होती. आम्ही जात असल्याच्या दुःखाने त्राण संपल्यागत ती जवळपास जमिनीवर पालथी पडली होती.

आम्ही स्थानकावर गेलो. माझ्या भावाने तिकिटे काढली आणि मला व माझ्या बहिणीच्या मुलाला मौजमजा करण्यासाठी प्रत्येकी दोन आणे दिले. आम्ही लगेच आमचा दंगेखोर दिनक्रम सुरू केला आणि सुरुवात म्हणून सोडालेमनची बाटली घेतली. थोड्याच वेळात शिट्टी वाजवत गाडी फलाटावर आली आणि आम्ही राहून जाण्याच्या भीतीपोटी शक्य होईल तितक्या जलदीने आत जाऊन बसलो. आम्हाला मसूर येथे उतरायला सांगितले होते. गोरेगावपासून सर्वात जवळचे रेल्वेस्थानक मसूर हे होते.

संध्याकाळी पाचच्या सुमारास गाडीने मसूर स्टेशन गाठले आणि आमच्या सामानसुमानासह आम्ही उतरलो. काहीच मिनिटांत गाडीतून उतरलेले सर्व प्रवासी आपापल्या दिशेने निघून गेले. आम्ही मुले फलाटावर उरलो. आम्ही चहूकडे शोधत होतो. कोठे माझे बाबा किंवा ते पाठवणार होते तो माणूस दिसेल म्हणून पाहात होतो. खूप वेळ आम्ही थांबलो, पण कोणीच आले नाही.

एक तास उलटून गेला. स्टेशनमास्तर चौकशी करायला आला. त्याने आमची तिकिटे मागितली. आम्ही त्याला ती दाखवली. आम्ही का खोळंबलो आहोत हे त्याने विचारले. आम्ही सांगितले की **“आम्हाला गोरेगावला जायचे असून माझ्या बाबांची किंवा त्यांच्या नोकराची आम्ही वाट पाहात होतो. पण कोणीच आले नाही आणि गोरेगावला कसे जायचे ते काही आम्हाला ठाऊक नाही.”**

आम्ही उत्तम पोषाखातील मुले होतो. आमच्या पोषाखावरून किंवा बोलण्यावरून आम्ही अस्पृश्यांची मुले आहोत हे कोणाच्याही लक्षात येण्याची शक्यताच नव्हती. स्टेशनमास्तरची तर खात्रीच होती की, आम्ही ब्राह्मणाघरची मुले आहोत आणि आमच्यावर ओढवलेल्या संकटामुळे तो कमालीचा हळहळला होता. नेहमीच विचारतात तसे त्याने आम्हाला विचारले, **“तुम्ही कोण आहात?”**

क्षणाचाही विलंब न लावता आम्ही महार असल्याचे मी फाटकन सांगितले (मुंबई इलाख्यात महार ही एक अस्पृश्य मानली गेलेली जात आहे.)

ते ऐकून तो सुन्न झाला. त्याचा चेहरा झटक्यात बदलला. तिरस्काराच्या भावनेने त्याचा कब्जा घेतल्याचे आम्हाला स्पष्ट दिसले. माझे उत्तर ऐकताक्षणी तो आपल्या खोलीत निघून गेला आणि आम्ही मात्र तेथेच राहिलो. पंधरा ते वीस मिनिटे गेली, सूर्य अस्तायमान झाला, बाबा आले नाहीत, की त्यांचा नोकरही आला नाही आणि आता तर स्टेशनमास्तरही आम्हाला टाकून निघून गेला होता. आम्हाला काहीच सुचेना. प्रवासाच्या प्रारंभी वाटलेल्या आनंदाची आणि मौजेची जागा आता कमालीच्या दुःखाने घेतली.

अर्ध्या तासाने स्टेशनमास्तर पुन्हा आला आणि आम्ही काय करायचे ठरवले असे त्याने विचारले. आम्ही म्हणालो की, **"एखादी बैलगाडी जर आम्हाला भाड्याने मिळाली तर आम्ही गोरेगावला जाऊ आणि जर ते फार लांब नसेल तर आम्ही लगेच निघू."** भाड्याने जाणाऱ्या अनेक बैलगाड्या उभ्या होत्या. पण आम्ही महार असल्याचे मी स्टेशनमास्तरला दिलेले उत्तर गाडीवानांपर्यंत पोहोचले होते आणि त्यामुळे त्यांच्यापैकी एकही जण विटाळ ओढवून घ्यायला आणि अस्पृश्य वर्गातील उतारूंना गाडीतून नेण्याचे खालच्या दर्जाचे हलके काम करायला तयार नव्हता.

दुप्पट भाड्याचे पैसे द्यायलाही आम्ही तयार होतो, पण पैशाचे तेथे काहीच चालेना.

स्टेशनमास्तर आमच्या वतीने मध्यस्थी करत होता, पण त्यालाही काय करावे ते कळेना. त्याच्या डोक्यात काहीतरी लख्खकन चमकल्याचे दिसले आणि त्याने आम्हाला विचारले, **"तुम्हाला गाडी हाकता येते काय?"**

आमच्या अडचणीवर तो उपाय शोधत असल्याचे दिसताच आम्ही ओरडलो, **"हो, येते ना!"** ते उत्तर ऐकून तो गाडीवानांकडे गेला आणि आमच्या वतीने त्यांना म्हणाला की **“हे दुप्पट भाडे देतील आणि स्वतःच गाडी**

**हाकतील."** गाडीवानाने पायीपायी गाडीमागे चालत जावे. एक गाडीवान तयार झाला. कारण त्यातून त्याला भाड्याचे पैसे तर मिळणार होतेच पण शिवाशिवीच्या संकटापासूनही तो बचावणार होता.

आम्ही निघायला तयार झालो तोपर्यंत सायंकाळच्या साडेसहाचा सुमार झाला होता. पण अंधार पडण्यापूर्वी आपण गोरेगाव गाठू, अशी खात्री होईपर्यंत स्टेशन सोडायची आमची तयारी नव्हती. त्यामुळे आम्ही गाडीवानाकडे अंतराची आणि गोरेगावला पोहोचायला किती वेळ लागेल याची विचारणा केली. तीन तासांपेक्षा जास्त वेळ लागणार नसल्याचे त्याने ठासून सांगितले. त्याच्या सांगण्यावर विश्वासून आम्ही आमचे सामान गाडीत चढवले, स्टेशनमास्तरचे आभार मानले आणि गाडीवर बसलो. आमच्यापैकी एकाने बैलांचे दोर हाती घेतले आणि गाडी निघाली. गाडीवान बाजूबाजूने पायी चालू लागला.

स्टेशनपासून जवळच नदी वाहात होती. ती तशी कोरडीच होती, फक्त पाण्याची काही तुरळक डबकी होती. गाडीचा मालक म्हणाला की, **"रस्त्याने पुढे कोठेच पाणी मिळणार नसल्यामुळे आम्ही तेथेच थांबून जेवणे उरकून घ्यावीत."** आम्ही ते मान्य केले. भाड्यातले थोडे पैसे आम्ही त्याला दिले तर तोसुद्धा शेजारच्या खेड्यात जाऊन जेवण करून येईल असेही तो म्हणाला. माझ्या भावाने त्याला काही पैसे दिले आणि लवकरच येतो असे सांगून तो गेला. आम्हाला सपाटून भूक लागली होती आणि पोटात दोन घास टाकण्याची संधी मिळाल्याने आम्ही सुखावलो होतो. माझ्या आत्याने शेजारच्या बायकांना राबवून आमच्या प्रवासातल्या शिदोरीसाठी काही छान-छान पदार्थ रांधून घेतले होते. आम्ही जेवणाची टोपली उघडली आणि खायला सुरुवात केली. काही वस्तू धुऊन घ्यायला पाण्याची गरज होती.

एक जण नदीच्या पात्रातल्या पाण्याच्या डबक्याकडे गेला. पण त्यात पाण्याचा पत्ताच नव्हता. घट्ट चिखलाचा आणि पाण्यावर आलेल्या गाई-म्हशीच्या व इतर प्राण्यांच्या शेणामुताचा तो गड्डा होता. खरे तर ते पाणी माणसांनी पिण्याच्या मुळीच लायकीचे नव्हते. त्याला येणारी दुर्गंधी एवढी तीव्र होती की, आम्ही तरी ते पिऊच शकणार नव्हतो. भूक भागण्यापूर्वीच आम्हाला जेवणे थांबवावी लागली आणि मग गाडीवान येण्याची आम्ही वाट पाहात बसलो. बराच वेळ झाला तरी तो आलाच नाही. तो दिसेल म्हणून सर्व दिशांकडे पाहण्याखेरीज दुसरे काहीच आम्ही करू शकत नव्हतो. एकदाचा तो आला आणि आम्ही आमचा प्रवास सुरू केला.

चार-पाच मैल आम्ही गाडी हाकत होतो आणि तो पायी चालत होता. मग तो एकदम उडी मारून गाडीत चढला आणि दोर त्याने आपल्या हाती घेतले. विटाळ होऊ नये म्हणून ज्या माणसाने आधी गाडी भाड्याने देण्यासही नकार दिला होता तो आपले सर्व धार्मिक विधिनिषेध बाजूला ठेवून आमच्यासोबत गाडीत बसायला राजी होतो हे त्याचे वागणे आम्हाला जरा विचित्रच वाटले, पण त्यावेळी त्याला कोणताही प्रश्न विचारायची आम्हाला हिंमत झाली नाही. आम्हाला आमच्या मुक्कामाचे ठिकाण गोरेगाव लवकरात लवकर गाठायची ओढ लागली होती. आणि त्यामुळे काही काळ तरी गाडी चालत राहण्यातच आम्हाला रस होता. पण थोड्याच वेळात आमच्या आजूबाजूला दाट अंधार झाला. अंधार कमी करणारे दिवे रस्त्यावर कोठेच नव्हते. आम्ही माणसाच्या जगात आहोत एवढाही दिलासा देणारा एखादा पुरुष किंवा स्त्री किंवा जितराब (जनावर) आमच्या जवळून जाताना दिसत नव्हते.

आम्हाला घेरून टाकणाऱ्या एकाकीपणाने आम्ही धास्तावून गेलो. आमची चिंता वाढत गेली. अंगचे सारे धैर्य आम्ही एकवटले. मसूरपासून आम्ही फार दूर येऊन ठेपलो होतो. तीन तास उलटून गेले होते. पण गोरेगावाच्या खाणाखुणा अजूनही दृष्टिक्षेपात येत नव्हत्या.

एक विचित्रच विचार आमच्या मनात तरळला. गाडीवान आपल्याशी बेईमानी करत असावा आणि तो आपल्याला एखाद्या निर्जन स्थळी नेऊन मारून टाकील असा संशय आम्हाला आला. आमच्या अंगावर बरेच सोन्याचे दागिने असल्यामुळे तर तो संशय अधिकच बळावला.

**"गोरेगाव अजून किती दूर आहे? आपण अजून तेथे कसे पोचत नाही?"** असे आम्ही त्याला पुनः पुन्हा विचारू लागलो आणि तो सांगत राहिला की, **"फार काही दूर नाहीय, आपण लवकरच तेथे पोहोचू."**

रात्रीचे दहा वाजले तरी गोरेगाव कोठे दिसत नाही हे पाहिल्यावर मात्र आम्ही मुलांनी रडायला आणि गाडीवानाला कोसायला सुरुवात केली. बराच वेळ आमचा विलाप आणि आक्रंदन सुरू होते. गाडीवान काहीच उत्तर देत नव्हता. तेवढ्यात आम्हाला काही अंतरावर दिव्याचा उजेड दिसला.

गाडीवान म्हणाला, **"तुम्हाला तो प्रकाश दिसतोय काय? जकात कलेक्टरच्या चौकीचा तो प्रकाश आहे. उरलेली रात्र आपण तेथे काढू."** आमचा जरा जीव भांड्यात पडला आणि आम्ही रडायचे थांबलो. दिवा बराच दूर होता. आपण तेथवर बहुधा पोचणारच नाही असे आम्हाला वाटत होते. जकात कलेक्टरच्या झोपडीपर्यंत पोचायला आम्हाला दोन तास लागले. मधल्या काळात आमची काळजी पुन्हा वाढली आणि आम्ही गाडीवानाला नाना प्रश्न विचारू लागलो. **"तेथे पोहोचायला उशीर का लागत आहे?", "आपला रस्ता तरी बरोबर आहे काय?"** वगैरे वगैरे.

शेवटी मध्यरात्रीच्या सुमारास गाडी जकातनाक्यावर पोहोचली. ते नाके टेकडीच्या पायथ्याशी व टेकडीच्या दुसऱ्या बाजूला होते. आम्ही पोहोचलो तेव्हा आम्हाला दिसले की, तेथे बऱ्याच बैलगाड्या रात्रीच्या विश्रांतीसाठी थांबलेल्या होत्या. आम्हाला खूपच भूक लागली होती आणि भरपूर खायची इच्छा होती. पण पुन्हा पाणी मिळण्याचा प्रश्न होता. कोठून तरी थोडे पाणी मिळेल काय असे आमच्या गाडीवानाला विचारले. त्याने आम्हाला धमकावले की, जकात कलेक्टर हिंदू आहे आणि आम्ही जर खरे बोलून महार असल्याचे सांगितले तर पाणी मिळण्याची मुळीच शक्यता नाही. तो म्हणाला, **"तुम्ही मुसलमान असल्याचे सांगा आणि आपले नशीब अजमावा."**

त्याच्या सल्ल्यानुसार मी जकात कलेक्टरच्या झोपडीपुढे उभा राहिलो आणि **“थोडे पाणी मिळेल काय?”** असे विचारले. **"कोण तुम्ही?"** त्याने विचारले. **"आम्ही मुसलमान आहोत,"** असे मी उत्तरलो. मी उर्दूतून त्याच्याशी संभाषण करीत होतो आणि ती भाषा मला उत्तम अवगत होती. त्यामुळे त्याला मी मुसलमान असण्याबद्दल शंका वाटण्याला जागाच नव्हती. पण ती युक्ती चालली नाही आणि तुसडेपणाने तो म्हणाला, **"तुमच्यासाठी येथे कोणी ठेवलंय पाणी? तिकडे टेकडीवर पाणी आहे. गरज असेल तर जा आणि पाणी घेऊन या. माझ्याकडे नाहीय पाणी,"** असे सांगून त्याने मला वाटेला लावले. मी गाडीजवळ परतलो आणि त्याचे ते उत्तर भावाला सांगितले. भावाला काय वाटले मला माहीत नाही. तो आम्हाला **“फक्त पडून राहा"** एवढेच म्हणाला.

बैलांची जोती काढली होती आणि जमिनीवर तिरपी करून गाडी टेकली होती. आम्ही गाडीतळीच्या फळकुटावर बिछाना पसरला आणि त्यावर शरीरे टाकून विसावलो. सुरक्षित अशा जागी एकदाचे पोहोचलो असल्यामुळे जे काय घडले ते काही आम्ही मनावर घेतले नाही. पण ताज्या प्रसंगाकडे मात्र आमची मने पुनःपुन्हा वळतच होती. आमच्यापाशी भरपूर अन्नपदार्थ होते. आमच्या पोटात भूक पेटली होती आणि हे एवढे सारे असूनही आम्हाला उपाशी पोटाने झोपणे भाग पडत होते. कारण आम्हाला घोटभर पाणी मिळणे दुरापास्त होते. कारण आम्ही अस्पृश्य होतो असा विचार अखेरीस आमच्या मनात आला.

मी म्हणालो, **"आपण सुरक्षित ठिकाणी पोहोचलो."** माझ्या थोरल्या भावाला उघडच अजून काही साशंकता होती. तो म्हणाला, **"आपण चौघांनीही झोपी जाणे शहाणपणाचे ठरणार नाही, काहीही होऊ शकते."** त्याने सुचवले की, एका वेळी दोघांनी झोपायचे आणि उरलेल्या दोघांनी पहारा ठेवायचा. त्या टेकडीच्या पायथ्याशी अशा रीतीने आम्ही अख्खी रात्र काढली.

सकाळी पाच वाजता उठून आमचा गाडीवाला आला आणि आम्ही आता गोरेगावकडे निघावे असे सुचवू लागला. आम्ही चक्क नकार दिला. आठ वाजेपर्यंत आम्ही जागचे हलणार नाही, असे आम्ही सांगितले. आता आम्हाला कोणताही धोका पत्करायचा नव्हता. तो काहीच बोलला नाही. त्यामुळे आम्ही सकाळी आठ वाजता निघालो आणि गोरेगावी अकरा वाजता पोहोचलो.

माझ्या बाबांना आम्हाला पाहून आश्चर्य वाटले. त्यांना आम्ही येत असल्याची काहीच खबर मिळाली नसल्याचे त्यांनी सांगितले, आम्ही म्हणालो की, **“आम्ही कळवले होते.”** पण ते मान्यच करीनात. शेवटी असे निदर्शनास आले की, दोष बाबांच्या नोकराचा होता. त्याला आमचे पत्र मिळाले होते पण ते तो बाबांना द्यायचे विसरला होता.

माझ्या आयुष्यात या प्रसंगाला फार मोठे महत्त्व आहे. जेव्हा तो घडला तेव्हा मी नऊ वर्षांचा बालक होतो. पण त्याचा माझ्या मनावर कधीच न मिटणारा ठसा उमटला आहे. हा प्रसंग घडण्यापूर्वी मला हे माहीत होते की, मी अस्पृश्य आहे आणि जे अस्पृश्य असतात त्यांना काही अपमानांना व भेदभावांना तोंड द्यावे लागते. उदाहरणार्थ, मला हे माहीत होते की, मी शाळेत माझ्या वर्गमित्रांमध्ये माझ्या गुणवत्तेनुरूप बसू शकत नव्हतो, तर मला एका कोपऱ्यात एकटे बसावे लागत होते.

मला हे माहीत होते की, वर्गाच्या खोलीत मला अंग चोरून बसण्यासाठी माझे वेगळे पटकूर (जून फटके कापड) न्यावे लागते आणि शाळा झाडायला नेमलेला चपराशी मी वापरलेल्या त्या पटकुराला स्पर्शही करणे शक्य नव्हते. मला शाळेतून बाहेर पडताना ते रोज घरी आणावे लागत होते आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा न्यावे लागत होते. शाळेत असताना मला हे माहीत होते की, स्पृश्य वर्गातल्या (वरच्या जातीतल्या) मुलांना तहान लागली की, ती नळावर जात, नळ उघडीत आणि आपली तहान भागवीत. फक्त त्यासाठी शिक्षकाची परवानगी घेतली की झाले.

माझी परिस्थिती निराळी होती. **मी नळाला स्पर्श करू शकत नव्हतो आणि कोण्या स्पृश्य माणसाने तो नळ माझ्यासाठी जर उघडला नाही तर मला माझी तहान भागवणे शक्य होत नव्हते.** माझ्याबाबतीत केवळ शिक्षकाची परवानगी पुरेशी नव्हती. शाळेच्या शिपायाची उपस्थितीही तेथे असणे गरजेचे होते. जर शिपाई जागेवर

नसेल तर मला पाण्यावाचून राहावे लागत असे. **'शिपाई नाही तर पाणी नाही'** अशा एका वाक्यात हा प्रसंग संक्षेपाने सांगता येईल.

घरी मला हे माहीत होते की, कपडे धुण्याचे काम माझ्या बहिणींनी करायचे असते. सातारा शहरात धोबी नव्हते अशातला भाग नव्हता. धोब्याला देण्यापुरते पैसे आमच्यापाशी नव्हते असेही नव्हते. माझ्या बहिणी कपडे धूत असत, कारण आम्ही अस्पृश्य होतो आणि अस्पृश्याचे कपडे धुवायला कोणताच धोबी तयार नव्हता.

केस कापण्याचे किंवा मुलांची हजामत करण्याचे काम आमची मोठी बहीण करत असे. आमच्या डोक्यांवर त्या कलेचा सतत प्रयोग करून करून ती त्यात अतिकुशल झाली होती. साताऱ्यात न्हावी नव्हता असे नाही, किंवा त्याला पैसे देणे आम्हाला परवडणारे नव्हते असेही नाही. केस कापण्याचे व हजामतीचे काम माझ्या बहिणीला करणे भाग पडत होते, कारण आम्ही अस्पृश्य होतो आणि कोणताही न्हावी अस्पृश्याची हजामत करायला राजी होणे शक्य नव्हते.

हे सारे मला माहीत होते. वरचा प्रवासाचा प्रसंग घडण्यापूर्वी इतर असंख्य स्पृश्य आणि अस्पृश्यांप्रमाणेच मलाही अस्पृश्यता ही एक **स्वाभाविक** म्हणजे **हे असंच असतंय** अशी बाब वाटत होती. पण **या प्रसंगाने मला जेवढा धक्का दिला तेवढा त्यापूर्वी मला कधीच बसला नव्हता. मला अस्पृश्यतेचा विचार करायला त्याने भाग पाडले.**